# सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस भरती सन -२०२२-२३

## उमेदवारांसाठी सर्वसाधारण सुचना

## शारीरिक / मैदानी चाचणी

- सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस शिपाई भरती प्रक्रिया ही तटस्थपणे, नि: पक्षपातीपणे व पारदर्शक ( Neutral, Impartial & Transparent ) होणार असून, संपुर्ण भरती प्रक्रियेमध्ये कोणताही गैरवापर व भ्रष्टाचार होणार नाही यासाठी पोलीस शिपाई भरतीकरीता दक्षता अधिकारी म्हणून मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र, कोकण भवन, नवी मुंबई हे आहेत.
- भरती प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडण्यासाठी उमेदवारांनी सहकार्य करावे. ऑनलाईन अर्ज भरताना वापरलेले युजर आयडी व पासवर्ड लक्षात ठेवावेत. तसेच अर्जामध्ये दिलेले भ्रमणध्वनी ( मोबाईल नंबर ) व ई-मेल आयडी कृपया बदलू नयेत.
- सर्व उमेदवार प्रवेशपत्रावर नमुद दिनांकास कागदपत्र पडताळणी / शरीरिक चाचणी / मैदानी चाचणीकरीता दिलेल्या ठिकाणी ( जिल्हा समादेशक कार्यालय सिंधुदुर्ग/ पोलीस परेड मैदान सिंधुदुर्ग ) येथे वेळेत हजर राहतील.
- उमेदवारांनी भरती प्रक्रियेबाबतच्या सुचना व निकाल वेळोवेळी policerecruitment२०२४.mahait.org, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई त्यांचे www.mahapolice.gov.in व सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस दलाचे sp.sindhudurg@mahapolice.gov.in या संकेतस्थळावर दिल्या जातील. त्याप्रमाणे उमेदवारांनी दिलेल्या सुचनांचे पालन करावे.
- भरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही चाचणीसाठी येण्या/ जाण्याकरीता उमेदवारांस प्रवास खर्च दिला जाणार नाही. उमेदवारास पोलीस भरती चाचणीकरीता स्वखर्चाने हजर रहावे लागेल.
- उमेदवाराने शरीरिक चाचणीकरीता येताना सोबत दि. १५/०४/२०२४ रोजी पर्यंतच्या दिलेल्या मुदतीतील मुळ कागदपत्रे व त्यांचे छायांकित सत्यप्रतीचे दोन संच तसेच अलीकडील (Latest) काढण्यात आलेले ०६ पासपोर्ट साईज फोटो आणावेत, प्रमाणपत्र मिळण्याकरिता सादर केलेल्या अर्जाचा पावत्या ग्राहय धरल्या जाणार नाहीत. मूळ प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास उमेदवारांस अपात्र ठरविण्यात येईल.
- उमेदवाराला अदा करण्यात आलेल्या प्रवेशपत्रावर / अर्जावर दुसऱ्याचा फोटो / सही असल्यास सदर उमेदवारास भरतीच्या ठिकाणी प्रवेश दिला जाणार नाही. प्रत्येक वेळेस प्रवेशपत्र सोबत आणणे बंधनकारक राहील.
- उमेदवारांना सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस शिपाई भरती प्रक्रियेत भ्रष्टाचाराबाबत काही माहिती समजून आल्यास किंवा प्रत्यक्षात भ्रष्टाचाराच्या तक्रारी करावयाच्या असल्यास पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सिंधुदुर्ग यांचा दुरध्वनी क्र. ०२३६२-२२२२८९ वर तक्रारी नोंदवाव्यात. तसेच असे गैरप्रकार रोखण्यासाठी पोलीस अधीक्षक कार्यालय, सिंधुदुर्ग येथे समन्वय अधिकारी म्हणून स्वतंत्र पोलीस अधिकाऱ्यांची नेमणुक करण्यात आलेली आहे. अशा प्रकारचे गैरव्यवहार निदर्शनास आल्यास त्याबाबतची माहिती पोलीस नियंत्रण कक्ष, सिंधुदुर्ग येथील व्हॉटस्ॲप क्र. ८२७५७७६२१३ वर व दुरध्वनी क्र. ०२३६२-२२८२०० वर तात्काळ दयावी.
- सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस शिपाई भरती प्रक्रियेमध्ये उमेदवारांना मोबाईल व कोणतेही इलेक्ट्रॉनिक साहित्य ( स्मार्ट वॉच, ब्ल्यूटुथ वगैरे ) स्वत: जवळ बाळगणे पूर्णत : मनाई आहे. तसेच त्यांनी आपले सोबत अनावश्यक व मौल्यवान वस्तू आणू नयेत.
- उमेदवाराने पोलीस भरती प्रक्रियेमध्ये उध्दट / गैरवर्तन केल्यास त्यास कोणत्याही क्षणी भरती प्रक्रियेमधून बाद करण्यात येईल. पोलीस भरती प्रक्रियेमध्ये नियमबाहय दबाव तसेच भ्रष्ट आचरण व वर्तणूक करणाऱ्या उमेदवारास अपात्र घोषित करण्यांत येईल.
- जे उमेदवार कागदपत्र पडताळणी, शारीरिक मोजमाप चाचणी ( उंची व छातीचे मोजमाप ) अपात्र ठरतील, अशा उमेदवारांना पुर्ण भरती प्रक्रियेतून अपात्र करण्यात येईल व त्यांना अपात्र असलेबाबत लेखी पत्र देण्यात येईल.
- उमेदवारांची बायोमॅट्रिक हजेरी घेण्यात येणार असल्याने उमेदवारांनी सोबत येताना आधारकार्ड घेवुन येणे आवश्यक आहे.
- उमेदवारांनी पोलीस भरतीमध्ये तोतयेगिरी ( डमी उमेदवार ) करण्याचा प्रयत्न केल्यास, त्यांचेविरुध्द तात्काळ फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल.
- एखादा उमेदवार भरती प्रक्रियेत सहभागी झाल्यानंतर कागदपत्र पडताळणी / शारीरिक व मैदानी यापैकी कोणत्याही एखाद्या चाचणी (इव्हेंन्टला ) गैरहजर राहिल्यास त्याची पुन्हा चाचणी घेण्याबाबत त्याला कोणतीही स्वतंत्र संधी देण्यात येणार नाही.
- कागदपत्र पडताळणी व शारीरिक चाचणी ( उंची/ छाती मोजमाप ) यामध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांची ५० गुणांची मैदानी चाचणी घेण्यात येणार असून, त्यामध्ये उमेदवारांना २५ गुण ( ५० टक्के ) गुण मिळविणे अनिवार्य आहे.
- पोलीस भरती प्रक्रियेच्या वेळी शारीरिक चाचणी दरम्यान उमेदवारास कोणतीही शारीरिक इजा / नुकसान झाल्यास त्यास उमेदवार स्वत: जबाबदार राहील. त्याकरीता उमेदवारांने स्वत:ची शारीरिक क्षमता विचारात घेऊन मैदानी चाचणीच्या प्रकारात सहभागी व्हावे.
- उमेदवारांना मिळालेल्या गुणांचे गुणपत्रक सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस दलाचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल व पोलीस मुख्यालय सिंधुदुर्ग येथे फलकावर लावण्यात येईल.
- पोलीस भरतीतील प्रक्रियेबाबत निवड समितीचा निर्णय अंतिम राहील व तो उमेदवारास बंधनकारक राहील